सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२/गट-क संयुक्त/२०२२/२४ दिनांक : २६ डिसेंबर, २०२२

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :-** **महाराष्ट्र गट-क सेवा, संयुक्त पूर्व परीक्षा - २०२२**
उद्योग निरीक्षक, दुय्यम निरीक्षक, कर सहायक व लिपिक-टंकलेखक या संवर्गांच्या निकालाबाबत
**संदर्भ :-** जाहिरात क्रमांक ७७/२०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शनिवार दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२२ रोजी आयोजित महाराष्ट्र गट-क सेवा, संयुक्त पूर्व परीक्षा - २०२२ मधील उद्योग निरीक्षक, दुय्यम निरीक्षक, कर सहायक व लिपिक-टंकलेखक या संवर्गासाठी विकल्प दिलेल्या उमेदवारांमधून पात्र ठरलेल्या उमेदवारांचा संवर्गनिहाय निकाल स्वतंत्रपणे दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत पदांकरीता पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकासह नावाची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**२.** प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी मुख्य परीक्षेसाठी विहित कालावधीत अर्ज करणाऱ्या तसेच परीक्षा शुल्क भरणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल.

**३.** आवश्यक तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**४.** मुख्य परीक्षेचा संयुक्त पेपर क्रमांक १ व संवर्गनिहाय स्वतंत्र पेपर क्रमांक २ च्या तारखा मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेमध्ये कळविण्यात येतील..

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल आरक्षणाच्या/समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात आला आहे.

**६.** प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे (SMS) कळविण्यात येईल.

**७.** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने आवश्यक माहिती तसेच परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहित पद्धतीने सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरीता स्वीकारार्ह ठरतील.

ठिकाण : मुंबई

उप सचिव (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई.